C.G.M. F No. 694 Dt. 8/9/11 M.S.P.G.C.L.

Dir. (F)/1936
Date 8.9.11

भुसावळ बदली प्रकल्पामध्ये लागणा-या खर्चासाठी महानिर्मिती कंपनी मर्यादितमध्ये भांडवली गुंतवणूक.
सन २०११-१२.

(Mahagenco) No. 4924 Dt. 7/9/11

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक: निधिवि-२०११/भुसावळ बदली/प्र.क.६४/ऊर्जा-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १६ ऑगस्ट, २०११

संदर्भ :- १. शासन परिपत्रक वित्त विभाग,क्र.अंदाज-२०.११/सी.आर.६५/अर्थसंकल्प-३ दि.३१ मार्च,२०११
२. शासन परिपत्रक उद्योग,ऊर्जाव कामगार विभाग, क्र.बीयुडी-२०११/२०११-२०१२/(२१२)/प्रशासन-१, दि.१८ एप्रिल, २०११

**प्रस्तावना:-**

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पाचे, नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी येणा-या खर्चापैकी २० टक्के इतकी रक्कम गुंतवणूक करण्यासाठी राज्य शासनाकडून भांडवलाच्या रुपाने महानिर्मिती कंपनीस उपलब्ध करुन द्यावयाची आहे. सदर रक्कम उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०११-१२ या वर्षामध्ये रु.२१,००,००,०००/- (रुपये एकवीस कोटी) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी रु.६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित यांना वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पाचे, नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी राज्य शासनाची भांडवली गुंतवणूक म्हणून रु.६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) वितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च अंदाजपत्रकीय लेखाशीर्ष मागणी क्र. के-११- "४८०१-वीज प्रकल्पावरील इतर भांडवली खर्च, ०२ औष्णिक विद्युत निर्मिती, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक, पंचवार्षिक योजना - राज्य योजना, (००)(०३) भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक (४८०१३७३१) ५४, गुंतवणूक " या खाली खर्ची घालण्यात यावा व तो सन २०११-२०१२ या वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतुदीमधून भागवावा.



Dir (Fin)
SM-IF 12-9-11

४. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.शा.प्र.पाटील, कार्यासन अधिकारी, आणि नियंत्रण अधिकारी म्हणून श्री.दि.का.खरात, उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई यांना भांडवली गुंतवणूक म्हणून मंजूर झालेली रक्कम रु.६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून **महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित** यांचे नांवे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येत असलेली रक्कम वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या कॅश फलोच्या मर्यादेत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.२६७/व्यय-१६/११, दि. २७/०७/२०११ मधील मंजूरीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कुंदा आ.रेठरेकर )
शासनाच्या अवर सचिव

प्रति,

१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत सुत्रधार कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०० ०२०.

४. महालेखापाल (लेखा परिक्षा ), महाराष्ट्र-१, मुंबई-४०० ०२०.

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.

६. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

७. निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या. प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

८. मुख्य अभियंता (विद्युत), महाराष्ट्र शासन, सा.बां.वि. प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

९. अवर सचिव (रोख), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. क.अ.(प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११. वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/साधनसंपत्ती/साऊ/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई-३२.

१२. निवड नस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.